**महिला व बाल विकास विभागाच्या अखत्यारित येणारी व बाह्ययंत्रणेद्वारे कंत्राटी पध्दतीने भरण्यात येणा-या पदांमध्ये अनाथांना विशेष प्राधान्य देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महिला व बाल विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : अनाथ-२०२०/प्र.क्र.९१/का-०३**
नवीन प्रशासन भवन, तिसरा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक- ०४ जानेवारी, २०२१.

**वाचा** :-१.शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्र.अमुजा-२०११/प्र.क्र.२१२/का.०३, दि.०२.०४.२०१८.
२.शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्र.अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का.०३, दि.२०.८.२०१९.
३.मा.राज्यमंत्री (महिला व बाल विकास) यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ११.२.२०२० रोजी बैठकीचे इतिवृत्त.

**प्रस्तावना :-**

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ अन्वये काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या अनाथ, निराधार बालकांना संस्थेतून बाहेर पडल्यानंतर जातीचा दाखला नसल्यामुळे विविध शासकीय लाभापासून वंचित रहावे लागते त्यामुळे अनाथ मुलांना राज्य शासनाच्या विविध सवलतींचा लाभ घेता यावा याकरिता अनाथांना उपरोक्त वाचा क्र.१ व २ मधील शासन निर्णयानुसार शिक्षण व नोकरीमध्ये १% समांतर आरक्षण देण्यात आलेले आहे. तथापि, महिला व बाल विकास विभागाच्या अखत्यारित येणारी अनेक पदे बाह्ययंत्रणेद्वारे कंत्राटी पध्दतीने भरली जातात.महिला व बाल विकास विभागाकडून कंत्राटी पध्दतीने भरल्या जाणा-या पदांमध्ये विशेषत जिल्हा बाल संरक्षण कक्षातील पदे, कौटूंबिक हिंसाचार प्रतिबंध अधिनियम २००५ अतंर्गत संरक्षण अधिकारी यांचे कार्यालय येथे सहाय्यक व बहुउद्देशीय कर्मचारी, बाल कल्याण समिती व बाल न्याय मंडळावर डाटा एन्ट्री ऑपरेटर, वन स्टॉप सेंटरची पदे अशा विविध पदांचा समावेश होतो. महिला व बाल विकास विभागाच्या विविध पदांमध्ये अनाथांना विशेष प्राधान्य देणेबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** :-

उपरोक्त पार्श्वभूमीच्या अनुषंगाने, महिला व बाल विकास विभागाच्या अखत्यारित येणा-या जिल्हा बाल संरक्षण कक्षाची पदे, कौटूंबिक हिंसाचार प्रतिबंध अधिनियम २००५ अतंर्गत संरक्षण अधिकारी यांचे कार्यालय येथे नियुक्ती कऱण्यात येणारी सहाय्यक व बहुउद्देशीय कर्मचारी, बाल कल्याण समिती व बाल न्याय मंडळ येथील डाटा एन्ट्री ऑपरेटर, वन स्टॉप सेंटर येथील पदे किंवा विभागाच्या अखत्यारित येणारी बाह्ययंत्रणेद्वारे कंत्राटी पध्दतीने

भरल्या जाणा-या इतर पदांचीही भरती करतांना अनाथांना विशेष प्राधान्य देण्यात यावे असा निर्णय घेण्यात येत आहे. यानुषंगाने खालील सूचना निर्गमीत करण्यात येत आहेत-

१. महिला व बाल विकास विभागाकडून सक्षम प्राधिका-याने वितरीत केलेले अनाथ प्रमाणपत्र अर्ज करतांना आवश्यक राहील.

२. पदभरती साठी आवश्यक असणारी शैक्षणिक,तांत्रिक, शारीरिक व इतर तत्सम पात्रतेच्या निकषांची पुर्तता करणे बंधनकारक राहील.

३. पदभरतीमध्ये विशेष प्राधान्य देणेबाबतचा अंतिम अधिकार नियुक्ती प्राधिका-याचा राहील.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२१०१०४१३०४४६३०३० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(र. सि. जरांडे)**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. सर्व मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.
२. मा.विरोधी पक्ष नेता, विधानसभा/विधानपरिषद, महाराष्ट्र राज्य.
३. सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
४. सर्व मंत्रालयीन विभाग.
५. संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
६. सचिव, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, वरळी, मुंबई.
७. आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे.
८. सर्व उप सचिव/ अवर सचिव/ कक्ष अधिकारी, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
९. सर्व विभागीय महिला व बाल विकास अधिकारी.
१०. सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी.
११. निवड नस्ती का.०३.